# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१९/ 1879

दिनांक :- 23 AUG 2019

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चे वाटप केलेल्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.**

**संदर्भ:** या कार्यालयाचे का.आ.क्रमांक :-

१. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक :- संकिर्ण २०१८/प्र.क्र.२०८/तांशि-४ दिनांक २१ जुन २०१८.

२. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१८/२११९ दि.०४.०९.२०१८

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे विविध कार्यालयीन आदेशान्वये आपणास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेपोटी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना देय असलेल्या रकमेचे वाटप करण्यात आलेले आहे.

तसेच संदर्भ २ अन्वये आपणास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विविध कार्यालयीन आदेशान्वये वाटप करण्यात आलेल्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यास कळविलेले आहे. तथापी आपण अजुनपर्यंत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

तेव्हा याव्दारे आपणास कळविण्यात येते की, आपणास या कार्यालयाव्दारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेपोटी वाटप करण्यात आलेल्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष बॅक खात्यात एनएफटी व्दारे रक्कम जमा केल्याबाबतची बॅकेचे विवरणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात संस्था प्रमुखांनी स्वतः लक्ष घालुन **दिनांक १/९/२०१९ पर्यंत** या कार्यालयास सादर करावे अन्यथा शासकीय नियमानुसार देय असणारा दंड आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सादर.

२.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.